# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.४/२०२५** **दिनांक ०८/०५/२०२५**
**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **गुरुवार दि.०८.०५.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे** आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/५११/२०२५ दि.०५.०५.२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **गुरुवार दि.०८.०५.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे** मा.श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के),**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **दि.२९.०३.२०२५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२२८** **दि.२९.०३.२०२५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत अद्ययावतीकरण (संगणके, नेटवर्क व डेटा सेंटर) करीता खरेदी प्रक्रिया राबविणेत आलेल्या खरेदी प्रक्रियेअंतर्गत निम्नतम दरधारक M/s Xtranet Technologies Pvt.Ltd. Hyderabad यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२२९/१** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**२. संस्थानचे नवीन शैक्षणिक संकुलामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.२२९/२** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**३. नागपुर व ठाणे शहरामध्ये श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२९/३** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**४. ठाणे व रतलाम या शहरांमध्ये श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२९/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**५. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षक अंतिम निवडीसाठी शासनाचे विधी व न्याय विभागाला प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२९/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**६. श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी (तज्ञ, अतिविशीष्ट तज्ञ) यांना श्री साईबाबा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांना देणेत येणा-या प्रोत्साहन भत्त्याप्रमाणे मासिक प्रोत्साहन भत्ता लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२९/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३ सन २०२५-२६ करीता श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दरांबाबत निर्णय होऊन कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२३० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय विभाग)**

---

**विषय नं.४** **सन २०२५-२६ करीता श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे स्वामी नारायण चपाती/पुरी तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दरांबाबत निर्णय होऊन कार्यादेश देणेबाबत**.

**निर्णय क्र.२३१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय विभाग)**

---

**विषय नं.५** **सन २०२५-२६ करीता श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंन्ट्रोलचे काम तसेच दररोज वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी मागविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२३२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय विभाग)**

---

**विषय नं.६** **श्री साईभक्तांना देण्यात येणारे प्रसाद भोजनातील चपाती व पुरीच्या गहू आटयात फोर्टीफाईड प्रिमीक्स मिक्स करणेबाबत.**

**निर्णय क्र.२३३ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय विभाग)**

---

**विषय नं.७** **सन २०२५-२६ करीता (माहे जून-२०२५ ते मे-२०२६ अखेर) मोतीचुर लाडू प्रसाद तयार करुन, उत्पादन तारखेच्या शिक्क्यांसह मागणीप्रमाणे लाडूची पॅकींग तयार करुन देणे, पॅकींग पाकीटे विक्री काऊंटरपर्यंत पोहोच करणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणे इ.कामी मागविणेत आलेल्या ई-निविदांमधील न्युनतम (L-1) दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२३४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग)**

---

**विषय नं.८ सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात लाडु व बुंदी प्रसाद बनविणेसाठी खर्च झालेल्या हरभरा डाळ व हिरवी विलायची या किराणा मालाच्या घट-तुटीची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२३५ अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग)**

---

**विषय नं.९ प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन आणि मंदिर विभागांसाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी किराणामाल व हरभरा डाळ खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२३६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१० श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व रुग्णालये विभागाकरीता लॉण्ड्री केमिकल/ डिटर्जंट खरेदीकामी ई-निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२३७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.११ सन २०२५-२६ साठी गाईचे शुध्द तूप खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारक यांचे प्लॅटंचे व्हेंडर ऑडीटसाठी संस्थानची टिम निश्चित होणेस व पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२३८ प्रथम दरांबाबत वाटाघाटी करुन तसेच व्हेंडर ऑडीट करुन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१२** **सन २०२५-२६ करीता आरोग्य विभागाकडील नवीन दर्शनरांग कॉम्पलेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२३९ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.१३** **साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उच्चतम दरधारक निविदाकार M/s Tata Communication Ltd., Mumbai यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२४० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) विभागासाठी टुल्स, इक्विपमेंट, इन्स्ट्रुमेंट साहित्य खरेदीकामी राबविण्यात येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२४१ प्रस्ताव मंजूर. उर्वरीत साहित्य खरेदी करण्यासाठी त्याचे स्पेसिफिकेशन निश्चीत करुन फेर ई-निविदा प्रकीया राबविण्यात यावी.**

**(कार्यवाही- औद्योगिक प्रशिक्षक संस्था)**

---

**विषय नं.१५** **साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा या विभागाकडील सन २०२५-२६ या एक वर्ष कालावधीसाठी निम्नतम दरधारक यांना लॉण्ड्री कामाचा कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२४२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास )**

---

**विषय नं.१६** **साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग, पेस्ट कंन्ट्रोल, फॉगींग स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, स्वच्छता, पेस्ट कंन्ट्रोल, फॉगींग कामाकरीता राबविणेत आलेली ई-निविदा प्रकीया रद्द करुन नव्याने दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२४३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास )**

---

**विषय नं.१७** **सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामधील संस्थानचे विविध विभागाकडील दैनंदिन वापराने खराब झालेल्या निरुपयोगी भंगार साहित्यांची विक्री करणेकामी प्राप्त ई-निविदेतील उच्चतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.२४४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- अभिलेख कक्ष )**

---

**विषय नं.१८** **प्रति वर्षाप्रमाणे सन २०२६ ते २०२८ या तीन वर्षाकरीता श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानतर्फे प्रचलित पध्दतीने प्रकाशित करणेस व साईभक्तांना विक्रीकामी उपलब्ध करुन देणेसाठी येणा-या छपाई खर्चास तसेच ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२४५ प्रस्ताव मंजूर. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१९** **सन २०२४-२५ करीता (दि.१.१२.२०२४ ते दि.३०.६.२०२५) संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेकामीची ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने सन २०२५-२६ करीता लेबर कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२४६ प्रस्ताव मंजूर. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही–कामगार विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२० श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सोशल मिडिया इन्फ्लुएन्सर्ससाठी शिर्डीत विशेष कार्यक्रम आयोजित करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४७ प्रस्ताव नामंजूर. या संदर्भाने स्वतंत्र नियमावली तयार करुन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.२१ जगभरातील विविध ठिकाणी असलेले श्री साईबाबांचे मंदिरातील अध्यक्ष, विश्वस्त व सचिव असे एकुण ०५ व्यक्तींना शिर्डी येथे वर्षभरात ०१ वेळेस विनामुल्य संस्थान शिष्टाचारासह दर्शन व्यवस्था करणे व त्याकामी नियमावली तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४८ उत्सवाचे दिवस वगळून प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.२२ शिर्डी संस्थान मंदिर परिसरामधील निर्माल्य साठविण्यासाठी जागा व निर्माल्यापासून तयार केलेले उत्पादने विक्रीसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत व मागील भाडे वसुलीबाबत.**

**निर्णय क्र.२४९ मागील कालावधीसाठी भाडे रक्कम व परवानगी शिवाय जागा वापरल्याने अतिरिक्त शुल्क रक्कम असे एकुण दुप्पट भाडे आकारणी करण्यात यावी व चालू निविदा कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे दराप्रमाणे भाडे आकारणी करण्यात यावी.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे इन्स्ट्रयुमेंट खरेदीमधील Laproscopic Instrument खरेदीकामी पात्र ऑनलाईन कमर्शियल ई-निविदेतील Pranav Medicare, Gujrat यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल )**

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे वार्षिक औषधे खरेदीमधील On consignment Basis Material खरेदीकामी दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेस व ज्या मटेरियलकरीता पुरवठा आदेश जात नाहीत त्याकरीता फेर ई-निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल )**

---

**विषय नं.२५** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे एकलस्त्रोत (Monopoly) साहित्य खरेदीकामी दर करार (Rate Contract) करुन पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५२ यापुर्वी सी. ए. दाखल केलेला आहे का याची तपासणी करुन फेर प्रस्ताव चक्रिय पध्दतीने सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा हॉस्पिटल मधील जनरल ओटी विभागाकरीता Mesic Diode Leser व Compact Ultrasonic Generator हे Meril कंपनीचे एकलस्त्रोत (Monopoly) मटेरीअल खरेदीस व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२७ श्री साईबाबा हॉस्पिटल मधील क्लिनिकल असिस्टंट (सी.व्ही.टी.एस.) ऐवजी कार्डीयाक सर्जन असे पदनाम बदलणेबाबत.**

**निर्णय क्र.२५४ पदनाम बदलण्याची प्रक्रिया संस्थानकडे उपलब्ध नाही सेवा प्रवेश नियम मंजूर झालेनंतर कार्डीयाक सर्जनची पदे भरतांना डॉ.मिस्तरी यांचा प्राधान्याने विचार करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२८ श्री. रविंद्र बाळासाहेब नवले, एच.आर.मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे हृदय प्रत्यारोपन (Heart Transplant) शस्त्रक्रियेकरीता वैद्यकीय परतावा मिळणेचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२५५ वैद्यकीय सल्ला व अंदाजीत खर्च यांचे कागदपत्रे दाखल झाल्यानंतर याबाबतचा प्रस्ताव चक्रिय पध्दतीने तातडीने सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२९ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.४,१९,६२५/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५६ प्रस्ताव मंजूर. परंतु यापुढे ज्या वैद्यकीय आजाराचा उपचार संस्थानचे रुग्णालयात उपलब्ध आहे, अशा उपचाराचे वैद्यकीय बिलाचा परतावा संस्थान कर्मचा-यांना दिला जाणार नाही.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३० संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१०,३५,०३५/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५७ प्रस्ताव मंजूर. परंतु यापुढे ज्या वैद्यकीय आजाराचा उपचार संस्थानचे रुग्णालयात उपलब्ध आहे, अशा उपचाराचे वैद्यकीय बिलाचा परतावा संस्थान कर्मचा-यांना दिला जाणार नाही.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३१** **श्री.मच्छिंद्र काशिनाथ थोरात, औषध निर्माता, श्री साईनाथ रुग्णालय यांनी मा.अध्यक्ष महोदया यांचेकडे केलेल्या अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२५८ अपील नामंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३२** **संस्थानमार्फत मौजे निमगाव को. येथील साई धर्मशाळा (गट नं.१७२) परिसरातील पुर्वेकडील पार्कींगमध्ये साईभक्तांचे सोईसाठी प्रसाधनगृह बांधकाम करणे कामाचे रु.१९,३५,६७९/- या निम्नतम दराचे निविदाधारक सौरभ रमेश तांबे, दाढ यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५९ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३३** **संस्थानमार्फत मौजे निमगाव को. येथील साई धर्मशाळा (गट नं.१७२) इमारतींमधील डक्टवर स्ट्रक्चरल वर्कसह Polycarbonate Transparent Plastic Roofing Sheet बसविणेकामी निम्नतम दराचे निविदाधारक मातोश्री इंटेरियर्स, अहिल्यानगर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३४** **संस्थानचे शिर्डी व परिसरातील जमीनीनां Precast R.C.C. Compound करणेकामाचे ठेकेदार श्री.आर.बी.कुंदे, श्रीरामपूर यांनी दंडआकारणी न करता दि.३१ जुलै,२०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेकामी केलेल्या अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२६१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३५ व्दारावती भक्तनिवास येथील पहिल्या व दुस-या मजल्यावरील खोल्यांना रंगकाम करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३६ संस्थानमार्फत सन २०२५-२६ या वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच पावसाळा या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी अंदाजे रक्कम रु.४७,४३,२९५/- इतक्या अपेक्षीत अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणे.**

**निर्णय क्र.२६३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग )**

---

**विषय नं.३७ श्री साई प्रसादालय परिसराचे पश्चिमेकडील निमगाव को. गट नं.८७,८८ मधील सध्याचे पार्किंगचे जागेत मल्टीलेव्हल पार्किंगसाठी (तळमजला+३ मजले) इमारत बांधणेबाबत.**

**निर्णय क्र.२६४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३८ श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई यांचेकडून संस्थानला मौजे निघोज, येथील साई पालखी निवारामधील देणगी मिळालेल्या इमारतीमधील उर्वरीत कामे पुर्ण करणेकामी अंदाजे रु.१३,२०,९६,६१६/- कोटी अधिक जीएसटी खर्चास मान्यता मिळणेस व या इमारतींचा शैक्षणिक उपक्रमांसाठी (स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन ॲकेडमी) वापर करणेबाबत**.

**निर्णय क्र.२६५ तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३९ संस्थानमार्फत करणेत येणारे बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सल्लासेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनल तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग )**

---

**विषय नं.४० साई पोलीस विश्रांतीगृह, शिर्डी येथे पिण्याचे पाण्याची सोय होणेबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांनी केलेल्या मागणीबाबत.**

**निर्णय क्र.२६७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग )**

---

**विषय नं.४१ नवीन दर्शन हॉल इमारतीमधील ए.सी.प्लान्ट यंत्रणा दुरुस्ती कामी येणा-या खर्चास व कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.४२ संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थाने करीता सेंट्रलाईज लॉन्ड्री युनिट करीता शेड उभारणी व मशिनरी खरेदी करणेकामी येणारे खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६९ प्रस्ताव मंजूर. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४३ शिर्डी पोलीस स्टेशनला पेट्रोलींगसाठी एक चारचाकी वाहन तात्पुरते देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७० प्रस्ताव मंजूर. पेट्रोलींगचे मार्ग व वारंवारीता संस्थानकडून निश्चीत करुन दयावेत. वाहनावर डॅश कॅमेरा बसविण्यात यावा.**

**(कार्यवाही- वाहन विभाग)**

---

**विषय नं.४४ चहा, कॉफी व दुध विक्रीचे दरवाढीबाबत.**

**निर्णय क्र.२७१ प्रस्ताव नामंजूर. (कार्यवाही- कॅन्टीन विभाग)**

---

**विषय नं.४५ सन २०२४-२५ मध्ये साईभक्तांना दर्शन रांगेत मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे व ५०० मिली पाणी वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२७२ अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- कॅन्टीन विभाग)**

---

**विषय नं.४६ श्री साईबाबा मंदिरामध्ये येणा-या भाविकांना प्रसाद म्हणून 'वृक्ष' प्रसाद देणेकामी निंब वृक्षाची रोपे सामाजिक वनिकरण / वनिकरण यांचेकडून खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७३ गुरुपौर्णीमा उत्सवाचे कालावधीत 'वृक्ष' प्रसाद योजना राबविण्यात यावी. बगीचा विभागाने रोपे तयार करावीत. (कार्यवाही- बगीचा विभाग)**

---

**विषय नं.४७ शिर्डी नगरपरिषद हद्दीतील अंगणवाडया श्री साईबाबा संस्थानव्दारे चालविणेबाबत.**

**निर्णय क्र.२७४ अंगणवाडी चालविण्याचा प्रस्ताव नामंजूर. संस्थानने अंगणवाडीतील मुलांना एक वेळचे मोफत भोजन देण्यात यावे. साईबाबांचे प्रचार आणि प्रसारा करीता 'शिर्डी माझे पंढरपुर' आरतीची माहिती मुलांना देण्यात यावी.**
**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/ श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.४८ संस्थानचे हैद्राबाद, बेंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४९ श्री. शेखर विजयराव कुलकर्णी, सी.सी.टी.व्ही. ऑपरेटर, सी.सी.टी.व्ही. विभाग यांची कर्करोग (कॅन्सर) आजाराची रजा मंजूर करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७६ दिनांक ०४.०६.२०२५ नंतर रजा मंजूरीचा प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५० श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी समाधी मंदिरचे सुरक्षेकरीता राज्य राखीव पोलीस सुरक्षा (SRPF) कडील सुरक्षा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२७७ प्रस्ताव मंजूर. गेटवर एम.एस.एफ. मार्फत नियुक्त स्थानिक कर्मचारी वगळून इतरांची नेमणूक करावी. (कार्यवाही- संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.५१ मा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र.१९५ दि.२९.०३.२०२५ अन्वये मंजूर झालेले देणगीदार साईभक्तांना द्यावयाच्या सुधारित सेवा-सुविधांमध्ये किरकोळ स्वरुपाचे बदल करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२७८ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.५२ माहे फेब्रुवारी-२०२५ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२७९ नोंद घेतली. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.५३ दि.०१.०१.२०२५ ते दि.३१.०३.२०२५ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीकरीता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२८० धोरणाअभावी अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावे. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.५४ सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात संस्थानकडून मुदतठेवीमध्ये गुंतवणूक केलेल्या रकमेचा वार्षिक अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८१ नोंद घेतली. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी (आरएमओ, सीएमओ व दंतरोग तज्ञ), मॅनेजर व ज्युनिअर बायोमेडीकल इंजिनिअर यांचे मासिक मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.२८२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर टप्प्या-टप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.२८३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **श्री साईबाबा शैक्षणिक संकुल येथे सुरु असलेल्या संगणकीय नेटवर्क उभारणीचे कार्यवाही अंतर्गत आवश्यक वाढीव काम अनुषंगिक साहित्यासह, याकामी दिलेल्या कार्यादेशातील दर व अटी-शर्तीनुसार मे.मिनीटेक यांचे मार्फत करुन घेणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८४ तहकुब.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४ संस्थान सेवेतील कायम व संस्थान कंत्राटी अधिकारी व कर्मचा-यांना गणवेश खरेदीकामी रोख रक्कम अदा करणेस व त्याकामी होणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८५ तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५ मा.तदर्थ समितीचे दि.२०.०१.२०२५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३ अन्वये लेखाशाखा विभागाने विद्युत विभागाचे सन २०१७ ते सन २०२३ अखेर चल मालमत्ता व सादिल / किरकोळ (Consumable Items) वस्तुंचे तपासणीवरुन सादर केलेल्या अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२८६ प्रस्ताव 'अ' मंजूर. प्रस्ताव 'ब' मधील अधिकारी /कर्मचारी मयत असल्याने वसुली करता येणार नाही. तसेच प्रस्ताव 'क' दप्तरी दाखल करण्यात यावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६ अब्दुल बाबांची समाधीवरील अतिक्रमणाबाबत.**

**निर्णय क्र.२८७ अब्दुल बाबांची समाधीजवळ सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात यावा, तसेच देणगी रक्कम दक्षिणा पेटीतच टाकावी इतरत्र टाकु नये, सदरचे क्षेत्र सीसीटीव्हीचे निगराणीत आहे, अशा आशयाचे बोर्ड लावण्यात यावेत.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७ नवीन स्प्लिट ए.सी. खरेदीकामी येणा-या खर्चास व पुनर्प्रत्ययी कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग )**

---

**वरील निर्णय क्र.२२८ ते २८८ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ. ७.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**[श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के)]**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**